25 जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत २८४ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूका-२०२२
आरक्षण सोडतीचा सुधारीत कार्यक्रम

सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक :- रानिआ/जिपपंस-२०२२/प्र.क्र.१०/का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २२/०७/२०२२

संदर्भ :- १) मा. सर्वोच्च न्यायालयाने पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह टू अपिल (सी) क्र.१९७५६/२०२१ व इतर संलग्न याचिकांमध्ये दि.१५/१२/२०२१, दि.१९/०१/२०२२, दि.०३/०३/२०२२, दि.०४/०५/२०२२ व दि.२०/०७/२०२२ रोजी दिलेला निर्णय

२) राज्य निवडणूक आयोगाचा आदेश क्र.रानिआ/जिपपंस-२०२२/प्र.क्र.४/का.७, दि.९/०५/२०२२ तसेच शुध्दिपत्रक दि.०८/०७/२०२२ व दि.१२/०७/२०२२

३) राज्य निवडणूक आयोगाचा आदेश क्र.रानिआ/जिपपंस-२०२१/प्र.क्र.१०/का.७, दि.१०/०५/२०२२

४) राज्य निवडणूक आयोगाचा सुधारणा आदेश क्र.रानिआ/जिपपंस-२०२२/प्र.क्र.४/का.७, दि. २२/०७/२०२२

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने मा. सर्वोच्च न्यायालंयाने विशेष अनुमती याचिका (सिव्हील) क्र.१९७५६/२०२१ मध्ये दि. १५/१२/२०२२ रोजी दिलेल्या आदेशास अनसरुन, जोपर्यंत राज्य शासन त्रितरीय चाचणी पूर्ण करीत नाही, तोपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता जागा राखून ठेवता येणार नाहीत, अशी तरतूद दि. ०९/०५/२०२२ च्या आदेशामध्ये केली होती.

आणि ज्याअर्थी, त्यास अनुसरुन २५ जिल्हा परिषदा व २८४ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आरक्षित जागा निश्चित करण्याकरिता आरक्षण सोडत दि. ०५/०७/२०२२ रोजी देण्यात आला होता. परंतु मा. सर्वोच्च न्यायालयाने पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह टू अपिल (सी) क्र.१९७५६/२०२१ व इतर संलग्न याचिकांमध्ये

दि.०४/०५/२०२२ रोजी दिलेल्या आदेशानुसार आयोगाचे संदर्भांकित अ.क्र.३ समोरील दि.१०/०५/२०२२ रोजीच्या आदेशान्वये २५ जिल्हा परिषदांमधील देय सदस्य संख्या निश्चित करण्यात आली असून त्यांची दि.२७/०६/२०२२ रोजी अंतिम प्रभाग रचना शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, आयोगाचे दि. १०/०५/२०२२ रोजीच्या आदेशान्वये जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या प्रभाग रचनेचा कार्यक्रम राबविण्यात आला होता. आयोगाच्या दि. ०५/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये २५ जिल्हा परिषदा व २८४ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूकाकरीता आरक्षण सोडतीचा कार्यक्रम देण्यात आला होता. परंतु मा. सर्वोच्च न्यायालयातील दाखल विशेष अनुमती याचिका क.१९७५६/२०२१ मध्ये राज्य शासनाने दाखल केलेल्या अर्जावर दि. १२/०७/२०२२ रोजी सुनावणी होऊन आयोगाच्या दि. ०५/०७/२०२२ रोजीच्या आदेशान्वये देण्यात आलेला जिल्हा परिषद व पंचायत समिती आरक्षण सोडत दि. १२/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये स्थगित करण्यात आला होता.

आणि ज्याअर्थी, सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९/२०२२, दि. ०१/०२/२०२२ अन्वये जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी राखून ठेवावयाच्या जागांची संख्या एकूण जागांच्या संख्येच्या २७% पर्यंत असेल, मात्र एकूण आरक्षण जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमधील एकूण जागांच्या ५०% पेक्षा अधिक असणार नाही अशी अधिनियमात तरतूद केली;

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयामधील विशेष अनुमती याचिका क्र.१९७५६/२०२१ मध्ये दि. १२/०७/२०२२ रोजी झालेल्या सुनावणीच्यावेळी शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे प्रमाण निश्चित करण्याकरिता गठीत केलेल्या समर्पित मागासवर्ग आयोगाने आवश्यक त्या बाबींची पूर्तता दि. ०७/०७/२०२२ रोजी आपला अहवाल शासनास सादर केल्याची बाब शासनाने अर्ज क्र.९२६९५/२०२२ अन्वये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली.

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २०/०७/२०२२ रोजीच्या सुनावणीत राज्य निवडणूक आयोगाने यापुढील निवडणुकांमध्ये समर्पित मागासवर्ग आयोगाने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन पुढील निवडणुका घेण्याबाबत आदेश दिले आहेत.

त्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशातील निर्णयानुसार २५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत २८४ पंचायत समित्यांच्या निवडणुकांमधील आरक्षण निश्चित करण्याचा कार्यक्रम देणे आवश्यक आहे. त्याकरिता २५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत २८४ पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला यांच्या आरक्षित जागा निश्चित करण्याकरिता आरक्षण सोडत काढण्यासाठी खालीलप्रमाणे सुधारीत आदेश देण्यात येत आहेत :-

## आदेश

१. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला यांच्या आरक्षित जागा निश्चित करण्यासाठी आरक्षण सोडतीचा कार्यक्रम सोबतच्या प्रपत्र-१ मध्ये देण्यात आला आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला व सर्वसाधारण प्रवर्गातील महिला यांच्याकरिता आरक्षित जागा निश्चित करण्याकरिता सोडतीचा कार्यक्रम राबविण्यात यावा.

२. जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या प्रभाग रचना व आरक्षणासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने दि.०९/०५/२०२२, शुध्दिपत्रक दि. ०८/०७/२०२२ व दि. १२/०७/२०२२ तसेच दि.२२/०७/२०२२ रोजी सुधारणा आदेश आदेश निर्गमित केले आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी आरक्षण सोडत काढण्याकरिता आयोगाचे उपरोक्त आदेशानुसार आरक्षण निश्चित करण्याबाबत उचित कार्यवाही करावी.

३. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करण्यासाठी अंतिम प्रभाग रचनेनुसार अनुसूचित जाती / अनुसूचित

जमातीच्या लोकसंख्येचा उतरता क्रम विचारात घ्यावा. तसेच आयोगाच्या दि.०९/०५/२०२२ च्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे चक्रानुक्रमाचे पालन करावे.

४. जिल्हाधिकारी यांनी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला व सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांचे आरक्षण निश्चित करण्यासाठी विहित नमुन्यात आरक्षण सोडतीची सूचना प्रसिध्द करावी.

५. जिल्हा परिषदेच्या आरक्षणाची सोडत ही जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तर पंचायत समितीच्या बाबतीत तालुक्याच्या मुख्यालयी, संबंधित तहसिलदारांकडून आरक्षणाची सोडत काढण्यात यावी. मात्र पंचायत समिती आरक्षण सोडतीवर नियंत्रण ठेवण्याकरिता जिल्हाधिकारी यांनी उपजिल्हाधिकारी पेक्षा कमी नसलेल्या दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करुन त्यांच्या देखरेखीखाली आरक्षित जागा निश्चित करण्याची कार्यवाही करावी.

६. सोडतीच्यावेळी अंतिम प्रभाग रचनेचा नकाशा व त्यांच्या चतु:सिमा, सोडतीसाठी येणाऱ्या नागरिकांना सहज दिसेल अशा ठिकाणी लावावा.

७. राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भांकित अनु. क्र. २ समोरील आदेशान्वये सोडत काढण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आली आहेत. त्यानुसार सोडत काढण्याकरिता योग्य ती उपाययोजना संबंधित जिल्हाधिकारी यांनी करावी.

८. आयोगाचे दि.०९/०५/२०२२ रोजीच्या आदेशातील परिच्छेद १२.४ नुसार जिल्हाधिकारी यांनी आरक्षण सोडत व आरक्षणावर हरकती व सूचना मागविणे याकरिता नेमून दिलेल्या दिनांकास विहित नमून्यात जाहीर सूचना प्रसिध्द करावी.

९. आरक्षणाच्या सोडतीनंतर सोडतीचा निकाल जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावा.

१०. सोडत काढून त्याची प्रसिध्दी करणे व विहित कालावधीत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचा विचार करुन आरक्षण अंतिमरित्या अधिसूचित करण्याचे अधिकार याद्वारे जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत. त्यानुसार निवडणूक विभाग व निर्वाचक गणाचे अंतिम आरक्षण विहित नमून्यात शासन राजपत्रात प्रसिध्द करावे.

उपरोक्त आरक्षण सोडत कार्यक्रमानुसार जिल्हाधिकारी यांनी प्रत्येक टप्प्यावरील अहवाल राज्य निवडणूक आयोगास सादर करावा. तसेच सोडतीची सूचना, सोडतीचा निकाल आणि अंतिम आरक्षण अधिसूचना इ. जिल्हयाच्या संकेतस्थळावर व सूचना फलक इ. ठिकाणी वेळोवेळी प्रदर्शित करुन त्याची योग्य ती प्रसिध्दी करावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सहपत्र - प्रपत्र - १

प्रत :-

१) सर्व जिल्हाधिकारी, (मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, धुळे, नंदूरबार, अकोला, वाशिम, नागपूर, भंडारा व गोंदिया वगळून)
२) अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-०१
३) सर्व विभागीय आयुक्त
४) राज्य निवडणूक आयोगाचे मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठांमध्ये नेमलेले वकील
५) राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
६) निवड नस्ती

( राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/जिपपंस-२०२२/प्र.क्र.१०/का.७, दि. २२/०७/२०२२ सोबतचे सहपत्र )

प्रपत्र-१

## २५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत २८४ पंचायत समित्यांचा आरक्षण व सोडतीचा सुधारीत कार्यक्रम

| अ.क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे | टप्पा सुरु करण्याचा / संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व सर्वसाधारण महिलांसह) यांच्याकरिता आरक्षण सोडतीची सूचना विहित नमुन्यात वृत्तपत्रात प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | २६/०७/२०२२ |
| २. | अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व सर्वसाधारण महिलांसह) यांच्याकरिता आरक्षित जागा निश्चित करण्याकरिता सोडत काढणे. | | |
| | अ) जिल्हा परिषद निवडणूक विभागासाठी | जिल्हाधिकारी | २८/०७/२०२२ |
| | ब) पंचायत समिती निर्वाचक गणासाठी | तहसिलदार | |
| ३. | सोडतीनंतर निवडणूक विभाग /निर्वाचक गणनिहाय आरक्षणाची प्रारुप अधिसूचना प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | २९/०७/२०२२ |
| ४. | निवडणूक विभाग /निर्वाचक गणनिहाय आरक्षण निश्चितीबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी | | २९/०७/२०२२ ते ०२/०८/२०२२ |
| ५. | आरक्षण निश्चितीबाबत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचा विचार करुन निवडणूक विभाग /निर्वाचक गणाचे अंतिम आरक्षण विहित नमुन्यात शासन राजपत्रात प्रसिध्द करणे. | जिल्हाधिकारी | ०५/०८/२०२२ |

**टिप :- जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील नोडल अधिकारी यांनी प्रत्येक टप्प्यावरील कामकाजाबाबतचा अहवाल आयोगास सादर करावा.**

( किरण कुरुंदकर )
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र